# प्रकरण सातवे

# उपसंहार

# प्रकरण सातवे

## उपसंहार

प्रितीसंगमाच्या प्राकृतिक वैभवाने धन्यता पावलेली कराड नगरी धार्मिक ऐतिहासिक नि सांस्कृतिक परंपरेची अभिमानास्पद लेणी घेऊन भारतीय जीवनाच्या सामाजिक नि राजकीय क्षेत्रात दिमाखाने वावरत आहे.

प्राचीन काळापासून कराड हे एक अतिशय महत्वाचे शहर होते. अनेक प्राचीन शिलालेख, ताम्रपट आणि महाभारत या महाकाव्यातून या शहराचा उल्लेख सापडतो. भरुत कुडयाच्या लेखावरुन कराड शहराच्या प्राचीनत्वाची साक्ष पटते. कराड जवळील अगाशिवाच्या डोंगरात बौध्द भिक्षूकरिता कोरलेली पुरातन लेणी आहेत. ही लेणी इ.स. च्या पहिल्या दोन शतकातील आहेत. यावरुन या ठिकाणी बौध्द धर्माचा प्रसार मोठया प्रमाणात झालेला दिसतो. तसेच प्राचीन काळातील भारतातील नालंदा, तक्षशीला, मगध ही प्रमुख विश्वविद्यालये होती. त्यापैकी मगध विश्वविद्यालयाची शाखा अगाशिवातील कराडच्या लेण्यात होती. पुरातन काळापासून कराड हे महाक्षेत्र गणले गेले असून त्यास 'दक्षिण काशी' मानतात. कराडचे प्राचीनत्व व महात्म्य सांगणारे 'करहाटक महात्म्य' नावाचे पुराण आहे.

प्राचीन कालखंडात मौर्य, सातवाहन, वाकाटक, चालूक्य (बदामी), राष्ट्रकुट, कल्याणीचे चालूक्य, शिलहार, यादव इ. राजघराण्याचा अंमल कराड शहरावरती होता. सातवाहन कालखंडात ते एक महत्वाचे व्यापारी केंद्र म्हणून प्रसिध्द होते. तर शिलहार घराण्यातील मारसिंह राजाची रुपवती कन्या चंद्रलेखा चे स्वयंवर इ. स. ११ व्या शतकात कराड नगरीत झाले. या शाही स्वयंवराचा सविस्तर वृत्तांत 'विक्रमांकदेव चरित्र' या ग्रंथात आलेला आहे. कराड ही त्यावेळी शिलहार घराण्याची

राजधानी होती. चंद्रलेखा ही शिलहार घराण्याची राजकन्या असून तिचा विवाह कल्याणीचे चालूक्य घराण्यातील सहावा विक्रमादित्य यांच्याशी झाला. या विवाहास भारतातील काश्मिर पासून ते कन्या कुमारी पर्यंतचे सर्व राजे-राजपुत्र कराडला जमा झाले होते असा उल्लेख सापडतो.

मध्ययुगीन कालखंडात बहामणी राज्याच्या पाच शाहीपैकी विजापुरच्या आदिलशाहीच्या अंमलाखाली इ.स. १४९७ च्या सुमारास आले व कराडचे इतिहास प्रसिध्द मनोरे व जामे मस्जिद बादशहा पहिला अल्ली अदिलशा यांच्या हुकुमावरुन बांधली. चाँदबिवीच्या काळात १८ मशिदी बांधण्यात आल्या.

मराठा कालखंडात कराडची देशमुखी १६३८-३९ साली शहाजी राजांना मिळाली. नंतर ती बाजी घोरपडे व झुंझारराव घाडगे यांना बहाल केली.

तसेच शिवछत्रपती महाराजांच्या पावन स्पर्शाने कराड भूमी पवित्र झाली. पुढे पंतप्रतिनिधीनी आपली राजधानी कराड येथे भुईकोट किल्लयात ठेवली. सन १८५५ प्रतिनिधींची राजधानी औंध येथे हलविली. कराड शहराचा मोबदला होऊन शहर इंग्रजांच्या ताब्यात गेले त्याच साली कराड नगरपालिकेची स्थापनाही झाली. व कराड शहराच्या विकासामध्ये एक महत्वाची घटना घडली की ज्यामुळे शहराच्या विकासाला एक वेगळे वळण मिळाले.

अभ्यासाअंति आपल्याला असे म्हणावे लागेल की कराड नगरपालिकेची स्थापना म्हणजे जिल्हयातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या विकासाचा महत्वाचा आदर्श आहे. म्हणून दुस-या प्रकरणामध्ये या संस्थेच्या विकासाचा थोडक्यात आढावा घेतला आहे. तसेच नगरपालिका स्थापनेचा विकास व तीची प्रशासन व्यवस्था यांचा थोडक्यात आढवा घेतला आहे. नगरपालिका विकासाचे प्रामुख्याने १२ टप्पे पाडले

आहेत. या प्रत्येक विभागाचे विकासाच्या दृष्टीने एक वेगळे महत्व आहे. नगरपालिका प्रशासनामध्ये त्या प्रत्येक बदलाचे एक वेगळेच राजकीय महत्व आहे. सुरुवातीला नगरपालिका प्रशासनावर अध्यक्ष म्हणून सरकारी अधिकारी कसा नियुक्त केला जात होता/ १८५८ साली सरकारी अधिकारी व नागरिकामधून नेमलेले पंच यांचे संयुक्त बोर्ड कशा प्रकारे अस्तित्वात आले. लोकप्रतिनिधींना करो सामातून घेणेत आले. पहिले लोकनियुक्त अध्यक्ष व पहिली स्थायी समिती व इतर उपसमित्या कशा स्थापन झाल्या, पहिली निवडणूक कशा प्रकारे झाली. एक्झिक्युटीव्ह ऑफिसर, नगरपालिकेस 'बरो म्युनिसिपालटीचे' स्थान कसे प्राप्त झाले. या विषयाचा वृत्तांत दिला आहे. तसेच स्त्री राखीव सदस्य संख्या, मागासवर्गीय लोकांच्यासाठी किती जागा होत्या तसेच नियमाप्रमाणे त्यात कशी वाढत होत गेली. स्विकृत सदस्य संख्या या विषयी माहिती थोडक्यात दिली आहे. तसेच नगरपालिका कार्यात प्रशासनालाही महत्वोच स्थान आहे. कारण नगरपालिकेने केलेले विकासात्मक कार्य आणि त्याचा परिणामकारकता त्यांचा दर्जा या सर्व गोष्टी नगरपालिका प्रशासनाशी संबंधित असतात. कराड नगरपालिकेच्या प्रशासनाचा अभ्यास केले नंतर निश्चित ते परिणामकारक व दर्जेदार आहे असे म्हणता येईल. कारण नगरपालिकेच्या उत्पन्नावर एक दृष्टीक्षेप टाकला असता ते वर्षाला वाढतच गेले आहे. जर लोकांचा दबाव व प्रशासन अपुरे पडले तर नगरपालिकेची आर्थिक स्थिती खिळखिळी बनेल आणि नेमके हेच नागरी विकास व प्रशासनातील मुळ अडसर आहेत आणि म्हणून नगरपालिकेचे व्यवहार करदात्याच्या मनाप्रमाणे असून चालणार नाहीत. नाही तर नगरपालिका लोककल्याणकारी योजना पूर्णच करु शकणार नाही. जरी नगरपालिका प्रशासनावर भ्रष्टाचार प्रलंबित प्रकरणे किंवा प्रकरणावरील निर्णयात चुका या नगरपालिका प्रशासनाने सुधारता येतील. नगरपालिका कर्मचारी वर्ग कर्तव्यदक्ष व तत्पर व कार्यक्षम

असेल तर वरील दोषारोप पुसून करदात्यांना योग्य न्याय मिळून लोकांना अधिक समाधान लाभेल. याबरोबर नगरपालिका प्रशासकीय कर्मचा-यांना पुरविलेल्या सोयी सुविधा, त्यांना पार पाडावी लागणारी कामे, नगरपालिका सेवकांची सहकारी पतसंस्था या विषयीचा वृत्तांत या प्रकरणामध्ये घेतला आहे.

कराड नगरपालिकेने उभारलेल्या नागरी सेवांमध्ये प्रामुख्याने सामाजिक आरोग्य व शहर स्वच्छतेला अतिशय महत्वाचे स्थान दिले आहे. हे सार्वजनिक आरोग्य व शहर स्वच्छता या विभागाच्या अभ्यासावरुन आपणास आढळून येते. सन १९८५-९३ मध्ये एकूण खर्चाच्या ७७१४८४५९ पैकी २०६९७५९ रु. आरोग्य व शहर स्वच्छता विभागावर खर्च करणेत आले होते. इतर सर्व खर्चापेक्षा नगरपालिकेने आरोग्य व शहर स्वच्छतेवर जास्त खर्च केला आहे याची कारणे ही आपणास सांगता येईल. की आरोग्य व शहर स्वच्छता या सामान्य माणसाच्या जीवनावर तत्कालीन परिणाम करणारा घटक आहे. शिवाय प्लेग, कॉलरा, देवी, इन्फ्लूंझा यासारखे साथीचे रोग थोपविणे आणि आजार होऊ नये म्हणून रोग प्रतिबंध लस टोचणी करणे, तसेच कुटुंब नियोजन व इतर नागरी आरोग्य सेवा योजना कार्यान्वित करणेसाठी खर्चाची तरतुद केली होती. तसेच शहर स्वच्छतेसाठी लागणारे साहित्य उदा. डी. डी. टी., एच. सी. एल. इ. खरेदी करणेसाठी व घरे निर्जतूक करणेसाठी लागणारे साहित्य व कामगार यांचा पगार भागविणेसाठी बराच खर्च करावा लागला होता. कराड नगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत गोरगरिब लोकांना मोफत वैद्यकिय सेवा, माता बालसंगोपन केंद्र, मलेरिया विरोधी मोहिम, जागतिक आरोग्य दिन साजरा केला जातो. या सर्व बाबींचा परामर्श या प्रकरणात थोडक्यात घेतला आहे.

कराड नगरपालिकेची सांस्कृतिक वाटचाल या प्रकरणाच्या अभ्यासाअंती नगरपालिका केवळ लोकांचे आरोग्य चांगले ठेवण्याचा प्रयत्न करणे असे नाही तर

कराड नगरीतील लोकांचा शैक्षणिक, बौध्दीक, शारिरीक, सांस्कृतिक विकास साधन्याचाही चांगला प्रयत्न करते. शैक्षणिक विकासात केवळ प्राथमिक शिक्षणावर भर दिला जातो असे नाहीतर सर्व तळागळातील विद्यार्थ्यांना पूर्व प्राथमिक ते उच्च शिक्षण देण्याचे आपले उद्दिष्ट मानून ते साध्यही केलेले आहेत. नगरपालिकेकडून पूर्व प्राथमिक व प्राथमिक शिक्षणाच्या सोयी उपलब्ध करुन दिल्या जातात. तसेच माध्यमिक व उच्च महाविद्यालयीन शिक्षणास ग्रँन्ट दिली जाते. प्राथमिक शिक्षणाचा पाया भक्कम करण्यासाठी नगरपाकिलेने - शाळांना प्रशस्त इमारती क्रिडांगण खेळाचे साहित्य प्रशिक्षित शिक्षक वर्गाची नियुक्ती करुन चांगले शिक्षण देण्याचा प्रामाणिक पणे प्रयत्न केलेला आहे. तसेच नगरपालिका शिक्षण मंडळाची स्थापना होण्यापूर्वी शिक्षण व्यवस्था कशाप्रकारे होती. शिक्षण मंडळ स्थापन झाल्या नंतरची परिस्थिती कशा प्रकारे होती. इंग्रजी शिक्षण, मुलींसाठी शिक्षण या बाबींचा परामर्श घेतला आहे. तसेच नगरपाकिलेने आपल्या अंदाजपत्रकात शिक्षणासाठी केलेल्या खर्चाचा आढावा घेतला आहे. नगरपालिका शिक्षण मंडळाच्या शाळामार्फत राबविल्या जाणा-या उपक्रमांचा आढावा घेतला आहे. तसेच कराड नगरपालिकेचे ग्रंथालय, ग्रंथसंख्या, ग्रंथालयान्दारे राबविले जाणारे उपक्रम यांचा आढावा घेतला आहे. तसेच कराड नगरीतील लोकांना दिली जाणारी व्याख्यानमालेची मेजवानी या द्वारे अनेक विन्दान व प्रसिध्द व्याख्यातांचा उल्लेख या प्रकरणामध्ये केला आहे. व्याख्यान मालेसाठी केल्या जाणा-या खर्चाचा आढावा घेतला आहे.

सन १८५५ ते १९९३ या दरम्यानच्या काळातील कराड नगरपालिका उत्पन्न व खर्चाचा अभ्यास केला तर नगरपालिकेचे उत्पन्न सतत वाढतच गेलेले दिसून येते. याची खात्री आपण उत्पन्न व खर्चाच्या रक्कमाचे पृथःकरण करुन अभ्यासलेने झाली आहे. जकात कर, पाणीपट्टी तसेच इतर कर आणि भाडे या पासून मिळणा-या

उत्पन्नात दरवर्षी भरच पडली आहे. त्याच बरोबर सरकारकडून मिळणारे अनुदान व वर्गणी हा एक उत्पन्नाचा महत्वाचा भाग आहे. नगरपालिकेच्या खर्चाच्या बाबीमध्ये सामान्य प्रशासन, सार्वजनिक सुरक्षितता, सार्वजनिक आरोग्य व शहर सफाई, शिक्षण देणग्या, वर्गण्या इ. बाबी असतात. या सर्वांचा आढावा पाचव्या प्रकरणात घेतला आहे. नगरपालिकेने नवीन उत्पन्नाच्या बाबींव्दारे आपले उत्पन्न वाढविण्याचा प्रयत्न केला गेला पाहिजे.

प्रकरण सहा मध्ये कराडच्या समाज जीवनाचे आणि संस्कृति संवर्धनाचे शिल्पकार व ग्रिनिज बुकात नोंद असलेले जागतिक विक्रमाचे व सुमारे चाळीस वर्षे नगराध्यक्ष पद भूषविणारे मा. पी. डी.पाटील यांच्या गौरवपूर्ण कार्याचा थोडक्यात आढावा घेतला आहे. १९५३ साली कराड नगरपालिकेचे नगराध्यक्ष झाले. नगराध्यक्ष पदी असताना त्यांनी केलेल्या कार्याचा इतिहास अभ्यासपूर्ण असल्याने त्यांच्या कार्या विषयीची माहिती मिळवण्याची गोडी लागणे सहाजिकच आहे. त्यांनी केलेले कार्य कोणत्याही व्यक्तीला अभिमनास्पद वाटणारे आहे. त्यांनी केलेल्या कार्याने कराड नगरीचा चेहरा मोहरा बदलून गेला व नगरपालिका आणखी विकासाच्या मार्गाला लागली. त्यांची दूरदृष्टी गावाचे असामान्य प्रेम त्यांचे कर्तृत्व व मनातील विद्यायक विचरांचे मोहोळ यांचा एकत्रीत परिणाम म्हणजे आजचे नवे रुप घेतलेले सर्व नागरी सुविधा या बरोबरच शहराचे सांस्कृतिक, शैक्षणिक, सार्वजनिक स्वरुप अभिरुची संपन्न बनवणारे कराड शहर होय. त्यांच्या प्रदीर्घ कालखंडात काही अपवादात्मक वर्षे वगळता सर्व ठराव एका विचराने एकमाने संमत झाले हा एक विक्रम मानावा लागेल.

या शहराचा करभार करताना एक नवा विचार आख्या महाराष्ट्रापुढे ठेवला. नागरी कारभार करीत असताना जात, पात, धर्म, पक्ष, गट ही माणसा भोवतालची कृत्रिम आवरणे नगरपालिकेच्या चौकटी बाहेर ठेवली व सर्व लोकप्रतिनिधींना एकत्र

करुन त्यांनी फक्त नागरी प्रश्नासाठी नगरपालिका हा नवा सिध्दांत समाजापुढे ठेवला. त्यांच्या कारकिर्दीत - शहरातील रस्ते, स्माशनभूमी, कार्यालयीन इमारत, भाजी मार्केट, शॉपींग सेंटर्स, भुयारी गटार योजना, हौसिंग सोसायटी, पाणीपुरवठा सोय, गंथालय, शिक्षण, व्याख्यानमाला, शिवाजी स्टेडियम प्रीतिसंगम योजना, नाटयगृह झोपडपट्टी पूनर्वसन इ. विधायक कामे नगराध्यक्ष असताना त्यांनी पूर्ण केली. तसेच फक्त नगराध्यक्ष एवढेच त्यांचे क्षेत्र मर्यादित राहिले नाहीत तर इतर क्षेत्रातही त्यांनी आपल्या कार्याचा ठसा उमटविला. सहकार्य मधील कार्यामध्ये सहयाद्री सहकारी साखर कारखाना मधील कार्य, शिवाजी शिक्षण संस्थेतील महत्वाचा वाटा, प्रीतिसंगम सहकारी पाणी पुरवठा संस्थेतील कार्य, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ सदस्य, शिवाजी विद्यापीठ सिनेट सदस्य, शासकीय औद्योगिक तंत्रनिकेतन संस्था निवड मंडळ सदस्य, कृष्णा चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वस्त यशवंतराव चव्हाण मध्यवर्ती प्रतिष्ठान मुंबईचे संस्थापक तसेच महाराष्ट्र विधान परिषदेचे व विधानसभेचे सदस्य म्हणून त्यांनी मोलाचे काम केले. ते एक अभ्यासू आमदार म्हणून महाराष्ट्रात परिचित होते इ. विविध क्षेत्रातील कार्याचा परामर्श घेतला आहे. तसेच १९६३ ते ६७ आणि १९८० ते १९८५ या काळातील त्यांच्या विधानसभेत कराड मतदार संघाचे प्रतिनिधित्व केले. त्यांच्या या कार्याचा परामर्श या प्रकरणात घेतला आहे.

अशाप्रकारे कराड नगरपालिकेने वरील कार्यक्रम यशस्वीपणे राबवून सन १८५५ ते १९९३ अखेर कराड नगरपालिकेने योग्य संतुलीत विकास साधला आहे. कराड शहाचा हा कायापालट कराडच्या नगरपालिकेने एक स्वतंत्र दृष्टीकोनाने एकात्म भावनेने आणि एकमताने घडवून आणला आहे. हे जेव्हा स्पष्टपणे जाणवते तेव्हा अनेक वेळेला विनोदविषय ठरलेल्या नगरपालिकेसारख्या लोक प्रतिनिधींच्या संस्थेचे कराडच्या वाटयाला आलेले आगळेपण प्रकर्षाने सिध्द झाल्याशिवाय रहात नाही.

नगरपालिकेच्या प्रधान कर्तव्यापैकी रस्त्यावरील झळकणा-या विद्युतनलिकाचा प्रकाश कराड नगरपालिकेच्या तेजस्वी कर्तव्याची नित्य प्रचिती आणून देतो. या प्राथमिक नित्याच्या कर्तव्यात कधीच आणि कोणतीही कसूर केली नाहीच. पण त्यांना अत्याधुनिक रेखीवपणा प्राप्त करुन दिला.

कराड नगरपालिकेने आज जवळ जवळ सर्व नागरी समस्यांना यशस्वी तोंड दिले आहे. व नागरिकांना शक्यतो सर्व सुविधा पुरविल्या आहेत. तरी देखील आज शहरामध्ये अनेक उद्योग प्रक्रिया असल्यामुळे रसायन मिश्रित पाणी, वायु प्रदुषण इ. गोष्टींना नागरिकांना तोंड द्यावे लागत आहे. तेव्हा नगरपालिकेने या प्रश्नाकडे कटाक्षाने लक्ष दिले पाहिजे. नगरपालिका प्रशासन अधिक प्रभावी होणेसाठी बुध्दीजीवी वर्गाने पुढाकर घेतला पाहिजे. स्थानिक समित्यांमध्ये रस घेऊन विकासात्मक वाटचाल केली पाहिजे. स्थानिक स्वराज्य संस्थेचा जनक लॉर्ड रिपणने ही आपली अशीच इच्छा व्यक्त केली होती. त्यांनी आपल्या 'व्हाट आय वॉन्ट 'या ग्रंथात लिहिले होते की, बुध्दीजीवी वर्गाने आपल्या स्थानिक विकासासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेमध्ये सहभागी होऊन विकास करुन घेतला पाहिजे. पण दुर्दैवाने आज याच्या उलट स्थिती असल्याने नगरपालिकांचा व्हावा तेवढा विकास झालेला दिसून येत नाही. तसेच भ्रष्टाचार पक्षपातीपणा, प्रलंबी प्रकरण इ. समस्यांना तोंड द्यावे लागते. तसेच आर्थिक प्रश्नही आहेत. तेव्हा वरील सर्व समस्यांचे निराकरण होणे गरजेचे आहे.

कराड नगरपालिकेने महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरु, डॉ. राजेंद्र प्रसाद, डॉ. बाबासाहेब आंबडेक र, यशवंतराव चव्हाण, शंकरराव चव्हाण व पी. डी. पाटील इ. भारतीय किर्तीच्या मान्यवरांना मानपत्र देऊन गौरविले.